नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

वर्ष - ३ रे | Year - 3rd | अंक - ३३७ | Issue - 337 | वार बुधवार दि. २९ एप्रिल २०२६ | Blow- Wednesday Date 29 April 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# सोलापूरला वाढवण बंदराशी जोडणार, लवकरच आयटी पार्कही सुरू होणार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस; सोलापुरातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या नवनिर्वाचित लोकप्रतिनिधींचा सत्कार सोहळा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज सोलापूर जिल्हा दौऱ्यावर असून बार्शी येथील श्री भगवंत प्रकट दिनाच्या निमित्ताने त्यांनी महापूजा केली. त्यानंतर, सोलापूर जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या नवनिर्वाचित सदस्यांचा सत्कार व कार्यकर्ता मेळाव्यात बोलताना त्यांनी सोलापूर जिल्ह्याचं अध्यात्मिक महत्त्व आणि विकासासंदर्भाने भाषण केलं. पंढरपूरला देशभरातून भाविक दर्शनसाठी येत असतात, त्यामुळे केवळ पंढरपूर नाही तर जिल्ह्याचं रुप बदलेल असा विकास करू, सोलापूरला वाढवण बंदराशी जोडण्याचं काम आम्ही करणार आहोत, असे म्हणत लवकरच येथे आयटी पार्कही सुरू होणार असल्याचं फडणवीसांनी म्हटलं. उजनीच्या पाण्याचं बाष्पीभवन थांबवण्यासाठी देखील आपण काम करतोय, अशी माहितीही त्यांनी दिली. तर, पंढरपूर कॉरिडोअरसंदर्भात व्यापाऱ्यांना विश्वास देत, तुमचा धंदा १० पट वाढेल असेही त्यांनी म्हटलं.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकाचे शिल्पकार येथील जनता आहे, त्यांनतर पालकमंत्री जयकुमार गोरे आणि त्यानंतर आमदारांची फौज आहे. या सगळ्यांनी मिळून हा विजय खेचून आणलाय, हा विजय विकासाचा विजय, विकासाच्या मुद्यावर ज्यांचा विश्वास त्यांचा विजय आहे. निवडून आलेल्या लोकप्रतिनिधीना सांगतो की, अनेकांना वाटतं माझ्यामुळेच मी निवडून आलो, त्यामुळे त्यांचा व्यवहार बदलत जातो. लोकं जसा तुमचा विकास पाहतात तसा तुमचा व्यवहारही पाहतात.




एकवेळ विकास कमी चालेलं पण व्यवहार लोकं जास्त लक्षात ठेवतात, एखादं काम होणार नसेल तरी लोकं म्हणतात आमच्याशी कसा वागतो, असे म्हणत काही लोकप्रतिनिधींना चिमटेही काढले. भाजपची परीक्षा ही मोदींनी कामे केलं यावर होणार आहे, पण स्थानिक व्यवहारावरुनही होणार आहे. आम्ही भ्रष्टाचार खपवून घेणार नाही, एखाद्याचा पद गेलं तरी चालेल, चांगल्या कामाशी देवाभाऊ पाठीशी पण चुकलात तर चुकीला माफी नाही, असेही फडणवीसांनी सोलापुरातील नवनिर्वाचित सदस्यांना ठणकावून सांगितलं.

सोलापूरच्या अभियांत्रिकी महाविद्यालयाचा प्रश्न गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित होता, पण आमचा प्रयत्न आहे याचं वर्षात ते महाविद्यालय सुरु व्हावं. आयटी पार्क घोषणा करून थांबलो नाही. फेब्रुवारीमध्ये आम्ही त्यासाठी जमीन देखील दिली. आता, लवकरच हे आयटी पार्क सुरु करून शिकलेल्या लोकांना इथंच कामं द्यायचा प्रयत्न आहे, असेही फडणवीसांनी म्हटले.

सोलापुरात आधुनिक रेडिमेड गारमेंट पार्क तयार करू, सोलापूरसाठी पाणी आम्ही आणलं आता प्रत्येक घरापर्यंत पोहोचवण्यासाठी योजना केली. हे कामं फार अडचणीच असतं, त्यामध्ये आपल्याला खूप लक्ष घालाव लागेल. जेव्हा मतं मागायला जाऊ तेव्हा प्रत्येकाच्या घरात पाणी मुबलक असायला हवं.

उड्डाणपूलाच्या बाबतीत केंद्राच्या अडचणी असतील तर आम्ही १५ दिवसात बैठक लावून घेतो. सोलापूरचं एअरपोर्ट आणि त्यावरुन विमानसेवा सुरु झाली. आता नाईट लँडिंग आणि मुंबईला योग्य वेळेत विमान जाईल अशी सुविधा द्यायची आहे, असेही फडणवीसांनी म्हटले. तसेच, ऑपरेटर जो स्लॉट मागेल नवी मुंबई विमानतळावर द्यायची जबाबदारी माझी आहे, असेही त्यांनी सांगितले.

महात्मा बसवेश्वर यांनी लोकशाही समजून दिली, त्यांच्या स्मारकासाठी लागेल तो निधी उपलब्ध करून देऊ, पंढरपूरला कॉरीडॉर करतोय, अनेकजण शंका घेत आणि लोकांना घाबरवण्याचे कामं करतायत.

पण, मुबलक मोबदला देतोय, ज्यांचं दुकानं त्याना दुकानं, जे योजनेत बसणार नाही त्याना स्पेशल पॅकेज देऊ. आज जो धंदा पंढरपूरमध्ये दुकानदारांचा होतोय, कॉरीडॉर झाला तर धंदा दहापट वाढेल अन्यथा माझं नावं तुम्हीच बदला, असेही फडणवीसांनी म्हटलं. अनेकांना पंढरपूरत यायचं आहे पण व्यवस्था नसल्याने लोकांना येता येतं नाही, केवळ पंढरपूर नाही तर जिल्ह्याचा रूप बदलेल असा विकास करू. सोलापूरला वाढवण बंदराशी जोडण्याचा काम आम्ही करणार आहोत, उजनीच्या पाण्याचं बाष्पीभवन थांबवण्यासाठी कामं करतोय, आजच बार्शीला भगवंताच्या प्रकट दिनानिमित्त जाऊन आलोय. पंढरपूर, तुळजापूर, अक्कलकोट ही महाराष्ट्राची अध्यात्मिक शक्ती या पंचक्रोशीत आहे.

सोलापूरकरांचा विश्वास वाया जाणार नाही याचा शब्द देतो, तुमची प्रमाणिक सेवा निवडून आणलेले लोकप्रतिनिधी करतील याचा शब्द देतो, भाजपला ना तुफान थांबवू शकतो ना ऊन हे तुम्ही दाखवून दिलं असे म्हणत विजयी लोकप्रतिनिधींचं कौतुकही मुख्यमंत्र्यांनी केलं.

## रशियाने भारतासाठी चौथी एस-४०० एअर डिफेन्स सिस्टम केली रवाना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : भारतासाठी मोठी आनंदाची बातमी मात्र पाकिस्तानला घाम फोडणारी अशी बातमी समोर आली आहे. ऑपरेशन सिंदूर दरम्यान, पाकिस्तानला भारताच्या एस-४०० एअर डिफेन्स सिस्टमने आणि एअर डिफेन्सच्या नारी शक्तीने चांगलाच दणका दिला होता. भारताच्या एस-४०० समोर पाकिस्तानची क्षेपणास्त्रे आणि ड्रोन अगदी निष्प्रभ ठरले होते. अशातच आता याच एस-४०० डिफेन्स सिस्टमबाबत मोठी अपडेट समोर आली आहे.

भारताला रशियाची पुन्हा साथ मिळाली असून रशियाकडून आता काही दिवसांत एस-४०० ची नवी खेप मिळणार आहे. रशियाने भारतासाठी चौथी एस-४०० एअर डिफेन्स सिस्टम रवाना केली आहे. मे महिन्याच्या अखेरीस ही प्रणाली तैनात होण्याची शक्यता आहे. यामुळे भारताची सुरक्षा आणखी मजबूत होण्यास मदत होणार आहे. ही नवीन एस-४०० प्रणाली राजस्थानमध्ये तैनात केली जाण्याची शक्यता आहे.



एका वृत्तानुसार रशियाने चौथी एस-४०० प्रणाली भारताकडे पाठवली आहे. मे महिन्याच्या मध्यापर्यंत ही सिस्टम भारतीय बंदरात पोहोचण्याची शक्यता आहे. तर त्यानंतर पाचवी एस-४०० प्रणाली यावर्षी नोव्हेंबरमध्ये भारतात पोहचण्याची शक्यता आहे. ऑपरेशन सिंदूरदरम्यान याच एस-४०० ने उत्कृष्ट कामगिरी केली होती. तिच्यासमोर शहबाज शरीफ आणि आसिम मुनीर यांच्या सर्व योजना फसल्या होत्या. आता आणखी प्रणाली भारतात दाखल होत असल्याने भारताची ताकद आणखी वाढली आहे.

मोदी सरकारने आधीच आणखी पाच एस-४०० एअर डिफेन्स सिस्टम खरेदी करण्यास मंजुरी दिलेली आहे. या प्रणालींमध्ये पाकिस्तानमधील कोणतेही हवाई लक्ष्य नष्ट करण्याची क्षमता आहे. याची मारक क्षमता सुमारे ४०० किलोमीटरपर्यंत आहे. उल्लेखनीय बाब म्हणजे, भारताने २०१८ मध्ये रशियासोबत पाच एस-४०० लाँग-रेंज सरफेस-टू-एअर मिसाइल सिस्टमसाठी ५.५ अब्ज डॉलरचा करार केला होता. सध्या भारताकडे तीन एस-४०० प्रणाली कार्यरत आहेत. उर्वरित लवकरच भारतात दाखल होणार आहे.

## उष्माघाताचा चौथा बळी; ७५ वर्षीय शेतकऱ्याचा मृत्यू

लातूर : यंदाच्या उन्हाळ्यातही एप्रिल महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात कडक उन्हाचा कहर जाणवत असून विदर्भ आणि मराठवाड्यात तापमान चांगलंच वाढलं आहे. उष्माघातामुळे काही ठिकाणी मृत्यू झाल्याच्याही घटना समोर आल्या आहेत. लातूर जिल्ह्यातही मे महिन्याच्या सुरुवातीआधीच उष्माघाताच्या घटनांमध्ये चिंताजनक वाढ होत असून आज आणखी एक दुर्दैवी घटना समोर आली आहे. निलंगा तालुक्यातील पानचिंचोली येथे ७५ वर्षीय शेतकऱ्याचा मृत्यू झाला असून उष्माघाताने त्यांचा मृत्यू झाल्याचा संशय नातेवाईकांनी व्यक्त केला आहे. त्यामुळे जिल्ह्यात उष्माघातामुळे मृतांचा आकडा आता चारवर पोहोचला आहे.

मृत शेतकऱ्याचे नाव त्र्यंबक नारायण बेळंबे असे असून दुपारी साडेबारा ते एकच्या सुमारास ते स्वतःच्या शेतात जनावरांसाठी चारा कापत असताना अचानक त्यांना चक्कर आली आणि ते खाली कोसळले. त्यांना तात्काळ पानचिंचोली येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात नेण्यात आले, मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. यापूर्वी जिल्ह्यात उष्माघातामुळे मृत्यू झाल्याच्या तीन घटना समोर आल्या होत्या. औसा तालुक्यातील एरंडी गावात २५ वर्षीय महेश लिंबाजी इंगोले या तरुणाचा शेतातील कामावरून घरी आल्यानंतर चक्कर येऊन मृत्यू झाला होता. तर, औसा तालुक्यातील गोंद्री येथे नऊ महिन्यांच्या बाळाचा उष्माघाताने मृत्यू झाल्याचा संशय व्यक्त करण्यात आला होता. आणखी एका घटनेत औराद शहाजनी येथे ६० वर्षीय शेतकऱ्याचाही प्रखर उन्हामुळे मृत्यू झाला होता. गेल्या काही दिवसांपासून लातूर जिल्ह्यात तापमानात सातत्याने वाढ होत असून तापमान ४० ते ४१ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचत आहे.

## विधान परिषदेसाठी भाजपची १४ नावांची सुधारित यादी दिल्लीला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : विधान परिषदेच्या १० जागांसाठी येत्या १२ मे रोजी होणाऱ्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपमध्ये घडामोडींना वेग आला आहे. प्रदेश कोअर कमिटीने पाठवलेली ३० नावांची लांबलचक यादी दिल्लीतील पक्षश्रेष्ठींनी नाकारल्यानंतर, आता भाजपने १४ नावांची सुधारित आणि छोटी यादी केंद्राकडे पाठवली आहे. यामध्ये प्रामुख्याने मुंबई वगळता राज्यातील पाच विभागांतील संघटनात्मक आणि जातीय समीकरणे साधणाऱ्या चेहऱ्यांना संधी मिळण्याचे संकेत आहेत.

विधान परिषदेच्या नऊ नियमित आणि एका पोटनिवडणुकीच्या जागांपैकी भाजपच्या वाट्याला ६ जागा येणार आहेत. त्यासाठी इच्छुकांची मोठी गर्दी झाल्याने सुरुवातीला ३० नावांची यादी पाठवण्यात आली होती. मात्र, निम्मी नावे कापून सुधारित यादी पाठवा, असा संदेश दिल्लीतून आल्याने १४ नावे निश्चित करून प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी यादी दिल्लीला पाठवून दिली आहे. उमेदवारी न मिळाल्यास होणारे 'नाराजीनाट्य' टाळण्यासाठी भाजप अर्जाच्या शेवटच्या दिवशी, म्हणजेच ३० एप्रिल रोजीच अधिकृत यादी जाहीर करण्याची शक्यता आहे.

पक्षातील सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, लोकसभा किंवा विधानसभा निवडणुकीत पराभूत झालेल्या नेत्यांना विधान परिषदेवर पाठवायचे नाही, असे धोरण भाजपने स्वीकारले आहे. त्याऐवजी संघटनेत दीर्घकाळ काम करणाऱ्या नव्या चेहऱ्यांवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. या शर्यतीत प्रामुख्याने डॉ. उपेंद्र कोठेकर, माधवी नाईक, रवी अनासपुरे, राजेश पांडे, दयाशंकर तिवारी यांची नावे चर्चेत आहेत. विवेक कोल्हे, जगदीश मुळीक आणि अर्चना पाटील चाकूरकर यांच्या नावांचीही चाचपणी सुरू आहे. राजकीय गणिते आणि जातीय समतोल साधताना भाजप कोणाच्या गळ्यात उमेदवारीची माळ टाकणार, याकडे आता राज्यातील इच्छुकांचे लक्ष लागले आहे. दिल्लीतील बैठकीनंतर पुढील काही तासांत पाच नावांवर शिक्कामोर्तब होण्याची शक्यता आहे. अर्ज भरण्यासाठी अवघे दोन दिवस शिल्लक असतानाही महायुती किंवा महाविकास आघाडीने आपल्या उमेदवारांची अधिकृत घोषणा केलेली नाही. संख्याबळानुसार महायुतीला नऊ तर मविआला एक मिळेल. त्यात भाजप ५, शिवसेनेला (शिंदे गट) २ आणि राष्ट्रवादीच्या (अजित पवार गट) एका जागेचा समावेश आहे. प्रज्ञा सातव यांच्या राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या पोटनिवडणुकीच्या जागेवर त्यांनाच पुन्हा उमेदवारी मिळण्याची दाट शक्यता आहे.

### प्रस्तावित बदल व सुधारणा विधेयकासंदर्भात मंत्रालयात बैठक

## राज्याचा स्वतंत्र बियाणे कायदा करणार : कृषीमंत्री भरणे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : शेतकऱ्यांना स्वतःचे बियाणे साठवणे, वापरणे, देवाण-घेवाण करणे आणि (ब्रँडेड नाव न वापरता) विक्री करण्यास कायदेशीर संरक्षण, शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे उपलब्ध व्हावेत, त्यांना कायदेशीर संरक्षण मिळावे तसेच बियाणे खराब निघाल्यास त्याची नुकसानभरपाई तात्काळ मिळावी, यासाठी राज्याचा सर्व शिफारशींसह स्वतंत्र बियाणे कायदा करणार असल्याची माहिती कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या २०२५ दुसऱ्या पावसाळी अधिवेशनात विधानसभेत देण्यात आलेले आश्वासन क्र ६७६ नुसार बियाणे कायदा १९६६ मधील प्रस्तावित बदल व सुधारणा विधेयकासंदर्भात मंत्रालयात आयोजित बैठकीत मंत्री श्री.भरणे यांनी निर्देश दिले. यावेळी आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने कायद्यात सकारात्मक निर्णय घेण्याच्या सूचना केल्या. बैठकीस दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे राज्यमंत्री आशिष जयस्वाल उपस्थित होते. तसेच आमदार सईताई डहाके, राजेश बकाने, हेमंत ओगले, रणधीर सावरकर, कृषी आयुक्त सुरज मांढरे आणि कृषी संचालक सुनिल बोरकर उपस्थित होते.



कृषी मंत्री श्री.दत्तात्रय भरणे म्हणाले की, राज्यासाठी स्वतंत्र बियाणे कायदा करताना प्रस्तावामध्ये शेतकऱ्यांना नुकसानभरपाई तातडीने मिळावी यासाठी ठोस तरतुदी कराव्यात. दर्जेदार बियाण्यांची जबाबदारी संबंधित कंपन्यांवर निश्चित करणे, महाबिज कंपनीची कार्यक्षमता वाढविणे, तसेच नियमभंग करणाऱ्या कंपन्यांवर कठोर कारवाई करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. याशिवाय जिल्हास्तरावर बियाणे तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्याची तरतूद करावी. 'साथी' पोर्टलवर ट्रुथफुल बियाण्यांची नोंदणी प्रक्रिया सुरू करणे, तसेच विद्यापीठांमार्फत होणाऱ्या संशोधन प्रक्रियेबाबत कायद्यात स्पष्ट तरतुदी करण्याचाही प्रस्तावात समावेश करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

नव्या कायद्यात बियाणे उत्पादक, प्रक्रिया केंद्र, वितरक, विक्रेते आणि रोपवाटिका यांची नोंदणी सक्तीची करण्याचा विचार आहे. रोपवाटिकांची नोंदणी अनिवार्य करून त्यांना रोपांच्या उगमाचा नोंदवही ठेवणे बंधनकारक केले जाईल. तसेच बियाण्यांच्या पिशवीवर क्यू आर कोड देणे आणि 'सेंट्रलाइज्ड सीड ट्रेसिबिलिटी पोर्टल'द्वारे बियाण्यांचा मागोवा घेणे अनिवार्य करणे, बियाण्यांमधील विषाणू, बॅक्टेरिया आणि बुरशी यांचे प्रमाण निश्चित करण्यासाठी 'सीड हेल्थ स्टँडर्ड्स' लागू करण्याची तरतूदही करण्यात येणार असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

दरम्यान, शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे पुरवठ्यासाठी शासनाने तांत्रिकदृष्ट्या सक्षम उपाययोजना केल्या असून 'साथी' पोर्टलवर सर्व उत्पादक संस्थांची नोंदणी १०० टक्के पूर्ण झाली आहे. खरीप २०२६ हंगामापासून सर्व प्रकारच्या बियाण्यांचे उत्पादन, वितरण आणि विक्री या पोर्टलमार्फत करण्याची व्यवस्था करण्यात येत आहे. यामुळे संपूर्ण पुरवठा साखळीचा मागोवा घेणे, प्रमाणीकरण करणे आणि उत्तरदायित्व निश्चित करणे अधिक सुलभ होणार आहे.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## संपादकीय....

### भारताची ताकद वाढली

भारतासाठी मोठी आनंदाची बातमी मात्र पाकिस्तानला घाम फोडणारी अशी बातमी समोर आली आहे. ऑपरेशन सिंदूर दरम्यान, पाकिस्तानला भारताच्या एस-४०० एअर डिफेन्स सिस्टमने आणि एअर डिफेन्सच्या नारी शक्तीने चांगलाच दणका दिला होता. भारताच्या एस-४०० समोर पाकिस्तानची क्षेपणास्त्रे आणि ड्रोन अगदी निष्प्रभ ठरले होते. अशातच आता याच एस-४०० डिफेन्स सिस्टमबाबत मोठी अपडेट समोर आली आहे. भारताला रशियाची पुन्हा साथ मिळाली असून रशियाकडून आता काही दिवसांत एस-४०० ची नवी खेप मिळणार आहे. रशियाने भारतासाठी चौथी एस-४०० एअर डिफेन्स सिस्टम रवाना केली आहे. मे महिन्याच्या अखेरीस ही प्रणाली तैनात होण्याची शक्यता आहे. यामुळे भारताची सुरक्षा आणखी मजबूत होण्यास मदत होणार आहे. ही नवीन एस-४०० प्रणाली राजस्थानमध्ये तैनात केली जाण्याची शक्यता आहे. एका वृत्तानुसार रशियाने चौथी एस-४०० प्रणाली भारताकडे पाठवली आहे. मे महिन्याच्या मध्यापर्यंत ही सिस्टम भारतीय बंदरात पोहोचण्याची शक्यता आहे. तर त्यानंतर पाचवी एस-४०० प्रणाली यावर्षी नोव्हेंबरमध्ये भारतात पोहचण्याची शक्यता आहे. ऑपरेशन सिंदूरदरम्यान याच एस-४०० ने उत्कृष्ट कामगिरी केली होती. तिच्यासमोर शहबाज शरीफ आणि आसिम मुनीर यांच्या सर्व योजना फसल्या होत्या. आता आणखी प्रणाली भारतात दाखल होत असल्याने भारताची ताकद आणखी वाढली आहे. मोदी सरकारने आधीच आणखी पाच एस-४०० एअर डिफेन्स सिस्टम खरेदी करण्यास मंजुरी दिलेली आहे. या प्रणालींमध्ये पाकिस्तानमधील कोणतेही हवाई लक्ष्य नष्ट करण्याची क्षमता आहे. याची मारक क्षमता सुमारे ४०० किलोमीटरपर्यंत आहे. उल्लेखनीय बाब म्हणजे, भारताने २०१८ मध्ये रशियासोबत पाच एस-४०० लाँग-रेंज सरफ ेस-टू-एअर मिसाइल सिस्टमसाठी ५.५ अब्ज डॉलरचा करार केला होता. सध्या भारताकडे तीन एस-४०० प्रणाली कार्यरत आहेत. उर्वरित लवकरच भारतात दाखल होणार आहे.

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या नवनिर्वाचित सदस्यांचा सत्कार व कार्यकर्ता मेळावा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : हरीभाई देवकरण प्रशाला, सोलापूर येथे राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस साहेब आणि ग्राम विकास व पंचायत राजमंत्री तथा सोलापूर जिल्हा पालकमंत्री श्री. जयकुमारजी गोरे साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत विजयी झालेल्या सर्व नवनिर्वाचित लोकप्रतिनिधींचा सत्कार व कार्यकर्ता मेळावा आज पार पडला.

या प्रसंगी दहिगाव जिल्हा परिषद गटातून सदस्य म्हणून निवडून आल्याबद्दल मा. देवेंद्रजी फडणवीस साहेबांच्या हस्ते माझा सत्कार झाला, ही माझ्यासाठी अभिमानाची बाब आहे. या सोहळ्यात सहभागी होताना जनतेने दिलेल्या विश्वासाची जाणीव अधिक दृढ झाली आणि आगामी काळात अधिक जबाबदारीने काम करण्याची प्रेरणा मिळाली. पंतप्रधान श्री. नरेंद्रजी मोदी साहेबांच्या सक्षम नेतृत्वाखालील केंद्र सरकार आणि राज्यात मा. फडणवीस साहेबांच्या नेतृत्वावर जनतेने दाखवलेला विश्वास हेच आमच्या कार्याचे बळ आहे.

याप्रसंगी सोलापूर जिल्ह्यातील मायबाप जनतेने दिलेल्या या प्रेम, पाठिंबा आणि आशीर्वादाबद्दल आदरणीय देवेंद्रजी फडणवीस साहेबांनी मनःपूर्वक कृतज्ञता व्यक्त करत, त्यांच्या अपेक्षांना न्याय देण्यासाठी अधिक जोमाने कार्य करण्याचा निर्धार भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी आणि सर्व नवनिर्वाचित लोकप्रतिनिधींच्या वतीने व्यक्त करण्यात आला. सोलापूरच्या सर्वांगीण विकासासाठी भाजप सरकार कटिबद्ध आहे, असा विश्वास यावेळी त्यांनी व्यक्त केला.

यावेळी मा. आमदार राम जी सातपुते, आ. सचिनदादा कल्याणशेट्टी, आ. समाधानजी आवताडे साहेब, आ. देवेंद्रजी कोठे, आ. विजय देशमुख साहेब, आ. सुभाष देशमुख साहेब, मा. खासदार रणजीतसिंह नाईक निंबाळकर साहेब, मा. आमदार प्रशांत परिचारक साहेब, महापौर विनायक कोंड्याल आणि जिल्हा परिषद अध्यक्ष दीपक वैद्य यांसह पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.




# स्मशानभूमीतील निष्काळजीपणा खपवून घेतला जाणार नाही : लोकनियुक्त नगराध्यक्ष डॉ. सौ. प्रणिता भालके

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर शहरातील हिंदू स्मशानभूमीतील गैरसोळीचा प्रश्न ऐरणीवर येतात लोकनियुक्त नगराध्यक्ष डॉ. सौ प्रणिता भालके यांनी आज स्वतः अधिकाऱ्यांसह प्रत्यक्ष पाहणी करत प्रशासनाला चांगलेच धारेवर धरले नागरिकांच्या शेवटच्या प्रवासातही त्रास होणार असेल तर ती प्रशासनाची मोठी अपयश आहे अशा शब्दात त्यांनी नाराजी व्यक्त केली.





या पाणीच्या वेळी मुख्याधिकारी महेश रोकडे, नगरसेवक किरण घाडगे, संजय बंदपट्टे, विनायक देवमारे, राहुल शिंदे, नगर अभियंता प्रकाश केसकर, पाणीपुरवठा अभियंता राज काळे, आरोग्य अधिकारी शरद वाघमारे, तसेच संबंधित ठेकेदार ही उपस्थित होते.

स्मशानभूमीत स्वच्छतेचा अभाव, अपुरी पाण्याची सोय, निकृष्ट लाईट व्यवस्था, शौचालयाची दुरावस्था, बसण्यासाठी बैठक व्यवस्थाणे अशा अनेक त्रुटीचा पाढा यावेळी वाचण्यात आला, तसेच वृक्षारोपण रंगरंगोटी व इतर मूलभूत सुविधा तातडीने उभारण्याची गरज अधोरेखित करण्यात आली. नगराध्यक्ष भालके यांनी संबंधित अधिकाऱ्यांना फर्स्ट शब्दात सूचना देता ही परिस्थिती तात्काळ बदलली नाही तर जबाबदारी निश्चित केली जाईल असा इशारा दिला व नागरिकांना कोणतेही अडचण येऊ नये यासाठी सर्व आवश्यक कामे प्राधान्याने पूर्ण करण्याचे आदेश त्यांनी दिले.

दरम्यान या पाहणीनंतर स्मशानभूमीतील प्रशासनावर तातडीने काम सुरू होईल काहीही केवळ पाणीपुरतेच राहणार याकडे नागरिकांचे लक्ष लागलेले आहे.

# नाशिक विभागीय शालेय थ्रोबॉल स्पर्धेत निफाडच्या वैनतेय विद्यालयाचा संघ अजिंक्य

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय नाशिक यांच्या वतीने विभागीय क्रीडा संकुल नाशिक येथे झालेल्या नाशिक विभागीय शालेय थ्रोबॉल स्पर्धेत निफाड येथील वैनतेय विद्यालय व ज्युनि. कॉलेज ऑफ सायन्सच्या १९ वर्षातील मुलींच्या संघाने विजेतेपद पटकावले.

या स्पर्धेत नाशिक ,धुळे ,जळगाव, नंदुरबार ,मालेगाव येथील ग्रामीण व मनपा क्षेत्रातील ८ संघ सहभागी झाले होते वैनतेयाच्या मुलींच्या संघाने अंतिम सामन्यात नाशिक मनपा संघाचा पराभव करीत विजेतेपद मिळविले विजयी संघ दिनांक ७ ते ९ एप्रिल २०२६ दरम्यान नांदेड येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेत नाशिक विभागाचे प्रतिनिधित्व करणार आहे.

विजयी संघास विद्यालयाचे उपप्राचार्य सुभाष खाटेकर, क्रीडा शिक्षक साहिल शेख ,रुपेश गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले, विजयी संघात ईश्वरी पवार, वैष्णवी शिंदे, गौरी सोनवणे, कल्याणी ताडगे, ऋतुजा कुशारे, साक्षी ढेपले, पूजा सेंद्रे, सानिका भालेराव, प्रतीक्षा केदारे, तनुजा वाघचौरे, दिशा ढमे या खेळाडूंचा समावेश होता.

विजयी संघाचे न्या.रानडे विद्या प्रसारक मंडळाचे कार्यकारी विश्वस्त वि. दा. व्यवहारे, सचिव रतन पाटील वडघुले विश्वस्त किरण कापसे, राजेंद्र राठी, अॅड. दिलीप वाघवकर, राजेश सोनी, प्रभाकर कुयटे, मधुकर राऊत, विश्वास कराड, नरेंद्र नांदे प्राचार्या मनीषा गुजराथी, उपप्राचार्य सुभाष खाटेकर, पर्यवेक्षक बी. बी गुंजाळ, पर्यवेक्षिका श्रीमती आर एम लाहोटी यांनी अभिनंदन केले.

# बार्टी संस्थेमार्फत महाराष्ट्र लोकसेवा आयोग विद्युत अभियांत्रिकीसेवा पूर्व परीक्षा २०२५ उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना मुख्य परीक्षा तयारी करिता आर्थिक सहाय्य देणेबाबत आर्थिक सहाय्य योजना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे,मार्फत महाराष्ट्र लोकसेवा आयोग महाराष्ट्र विद्युत अभियांत्रिकीसेवा पूर्व परीक्षा २०२५ उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना मुख्य परीक्षा तयारी साठी एकरक्कमी आर्थिक सहाय्य देण्यात येणार आहे. या परीक्षेस पात्र असलेल्या महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीच्या उमेदवारांना मुख्य परीक्षेच्या तयारीसाठी प्रती विद्यार्थी रक्कम रु. १५,०००/- एकरक्कमी आर्थिक सहाय्य देण्यात येणार आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोग महाराष्ट्र विद्युत अभियांत्रिकीसेवा पूर्व परीक्षा २०२५ उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना मुख्य परीक्षेच्या तयारीसाठी आर्थिक सहाय्य देणेबाबत घोषित केला आहे. सदर निकालानुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोग विद्युत अभियांत्रिकीसेवा पूर्व परीक्षा २०२५ उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना मुख्य परीक्षा तयारी करिता आर्थिक सहाय्य देणेबाबत. पात्र असलेल्या उमेदवारांना एकरक्कमी रक्कम रु. १५,०००/- चे आर्थिक सहाय्य देण्यात येत आहे. त्याबाबत सविस्तर जाहिरात व ऑनलाईन फॉर्म बार्टी संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आला आहे. जास्तीत जास्त पात्र उमेदवारांनी सदर योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन बार्टी संस्थे मार्फत करण्यात येत आहे.

अधिक माहितीसाठी http://barti.maharashtra.gov.in > NOTICEBORD > Maharashtra Public Service Commission - Electrical Engineering Services Mains Examination 2025 येथे भेट द्यावी.

# मोहा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त मिरवणूक



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मोहा/प्रतिनिधी : प्रविण कसबे कळंब तालुक्यातील मोहा येथे विश्वरत्न, भारतरत्न भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमेची दरवर्षीप्रमाणे याही वर्षी गावातून मोठ्या उत्साहात भव्य मिरवणूक काढण्यात आली.प्रारंभी बाबासाहेबांच्या प्रतिमेचे पूजन मा. जिल्हा परिषद सदस्य तथा कळंब कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक श्री.संदिप मडके, ऑल इंडिया पँथरसेनेचे जिल्हाध्यक्ष व जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष अशोक कसबे, विविध कार्यकारी सहकारी सेवा सोसायटीचे संचालक प्रविण कसबे, बाबा कसबे, तानाजी कसबे, जयंती उत्सव समितीचे उपाध्यक्ष मिलिंद कसबे,उत्सव समितीचे खजिनदार आकाश कसबे, यांच्या हस्ते करण्यात आले. मिरवणूक प्राथमिक आरोग्य केंद्र ते गावातील मुख्य चौकातून काढण्यात आली.वित्सर्जन समाज मंदिर येथे करण्यात आले. मिरवणूकीत बाबासाहेबांच्या प्रतिमेचे व डिजेचे, मुख्य आकर्षण होते.या कार्यक्रमात अमोल कसबे यांनी स्वखर्चाने थंड पाण्याच्या जीआरची सोय केली होती. यावेळी ग्रामपंचायत सदस्य राहुल कसबे, आत्माराम लकडे,,पी.जे.कसबे सर,भारत कसबे, जयंती उत्सव समिती सह खजिनदार अभिजित कसबे, गणेश कसबे, फकीर कसबे, शशिकांत कसबे, सौरभ ओव्हाळ,प्रशांत कसबे,परसराम मीकसबे, रणजित कसबे, ग्रामपंचायत सदस्य महावीर कसबे,काका सोनवणे, बन्सी कसबे, संकेत कसबे, अरविंद हिरवे, किसन जाधव माजी सैनिक सुरेश कसबे तसेच भिमसैनिक व महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. पोलिस उपनिरीक्षक पठाण व पोलीस कर्मचाऱ्यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

# महसूल मंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली बैठक; यमाई तलावालगतची जमीन हस्तांतरणाबाबत जिल्हाधिकारी सोलापूर यांना तात्काळ प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : पंढरपूर शहरातील गट क्रमांक १६१ मधील यमाई तलावालगत असलेल्या सुमारे ३ हेक्टर १२ आर क्षेत्रफळाच्या शासन मालकीच्या जमिनीचे श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांना हस्तांतरण करण्याबाबत महसूल मंत्री चंद्रशेखरजी बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली दि. २८ एप्रिल रोजी मंत्रालय, मुंबई येथे बैठक संपन्न झाली.

या बैठकीदरम्यान, सदर जमीन मंदिर समितीकडे हस्तांतरित करण्यासाठी जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी तात्काळ शासनास प्रस्ताव सादर करावा, असे निर्देश मंत्री महोदयांनी दिले. सदर जागा मंदिर समितीस प्राप्त झाल्यानंतर त्या ठिकाणी भाविकांच्या सोयीसाठी पर्यटन (सहल) केंद्र तसेच गोमाता जतन व संवर्धन केंद्र उभारण्यात येणार आहे.

बैठकीस ऑनलाइन पद्धतीने मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, अप्पर जिल्हाधिकारी गणेश निराळी, मंदिर समिती सदस्य भास्करगिरी महाराज, प्रांताधिकारी सचिन इथापे, पंढरपूर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी महेश रोकडे तसेच प्रत्यक्ष मंदिर समिती सदस्या ड. माधवी निगडे तसेच कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके उपस्थित होते.

सद्यस्थितीत, या जागेवर मंदिर समितीची गोशाळा कार्यरत असून सुमारे २५० लहान-मोठी गाई व वासरे येथे आहेत. या गाईंमधून मिळणाऱ्या दुधाचा उपयोग श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या नित्योपचारासाठी केला जातो. प्रस्तावित प्रकल्पासाठी मंदिर समितीने प्रारूप आराखडा तयार केला असून सदर काम मंदिर समितीच्या निधीतून करण्यात येणार असल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# सोलापूर अन्नधान्य वितरण कार्यालयाचे आणखी एक गैरप्रकरण उघडकीस

## प्रभारी अन्नधान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : आपल्या प्रशासकीय सेवेत शिस्तप्रिय राखून अवैधरित्या गॅस चालविणाऱ्या व रास्त भाव दुकानदार अश्या अनेकांचे धाबे दणाणून सोडणारे प्रभारी अन्नधान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे हे आता स्वतःच्या अधिकाराचा गैरप्रकार करत कालच प्रसार माध्यमातून एक प्रकरण उघडकीस येतो ना येतो,तोच पुन्हा एक प्रकरण चव्हाट्यावर येऊन धडकला आहे. जुळे सोलापुरातील आणखी एका रास्त भाव धान्य दुकान असलेल्या संस्थेने आपले दुकान अशोक चौक भागात स्थलांतर करुन मिळावे असा अर्ज अन्नधान्य वितरण कार्यालयात दाखल केला. मूळ अर्जात जुळे सोलापूर पासून अशोक चौक परिसर हे २ किलोमीटर अंतरावर असल्याचे नमूद केले, त्याप्रमाणे संबंधित पुरवठा निरीक्षकांनी सदर मागणी नियमबाह्य असल्याचे अहवाल वरिष्ठ कार्यालय असलेल्या अन्नधान्य वितरण अधिकारी ह्यांच्याकडे सादर करण्यात आले. त्याप्रमाणे वरिष्ठ कार्यालयाकडून सदर प्रकरण फेटाळण्यात आले. त्या अनुषंगाने संबंधित संस्थेने उपायुक्त कार्यालय पुरवठा विभाग पुणे येथे अपिल अर्ज दाखल केला. तिथेही त्यांचा अर्ज फेटाळला गेला, तदनंतर सदर संस्थेने अन्न व नागरिक पुरवठा मंत्री, मुंबई मंत्रालयात पुन्हा अपिल अर्ज करण्यात आले. तिथूनही फेरचौकशी होऊन मंत्री महोदयाच्या आदेशात सध्यास्थितीत असलेल्या दुकानापासून २ किलोमीटर पर्यत असलेल्या जागेत पाहणी करुन, संस्थेच्या मागणी नुसार आसपास च्या दुकानातून अपात्र शिधापत्रिका संबंधित दुकानास जोडण्यात यावे त्याप्रमाणे आदेशाचे पालन करावे असे स्पष्ट उल्लेख असताना देखील चक्क प्रभारी अन्न धान्य वितरण अधिकारी असलेले ओंकार पडोळे ह्यांनी दस्तुरखुद्द अन्न व नागरिक पुरवठा मंत्री मंत्रालय मुंबई ह्यांच्या आदेशाला फाटा देत जुळे सोलापूर पासून २ किलोमीटर अंतर न पाहता जवळपास ५ किलोमीटर असलेल्या अंतरावर दुकानाची मंजुरी दिले.त्याच प्रमाणे संबंधित दुकानास आसपास असलेल्या दुकानातून अपात्र असलेल्या शिधापत्रिकाधारकांना दुकानात पात्र म्हणून जोडण्यात यावे असा चक्क बेकायदेशीर सूचना संबंधित कार्यालयास दिले. आसपास असलेल्या दुकानात जे अपात्र शिधापत्रिका धारक आहेत त्यांचे उत्पन्न ५९,०००/– हजार च्या वर असलेल्यामूळेच अपात्र ठरविलेले असतानाही त्यांना अन्न सुरक्षा लाभार्थी योजनेत समाविष्ठ करण्यासाठी मोघलशाही फर्मान सोडण्यात आले. ह्यावरून प्रभारी असलेले अन्न धान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे आपल्या अधिकाराचा गैरवापर केलाचा पुन्हा एकदा स्पष्ट होताना दिसत आहे. कालच अश्याच एका बेकायदेशीर प्रकरण समोर येत पडोळे ह्यांनी आपल्या चुकीच्या कार्य पद्धतीचा खाते उघडल्याने आता हे दुसरे प्रकरण समोर आल्याने आणखी किती प्रकरण समोर येणार ह्याची उत्सुकता सर्वांनाच लागून राहिल्याने जिल्हाधिकारी कार्यालयात एकच खळबळ उडाली आहे. आता ह्याकडे जिल्हाधिकारी लक्ष देणार का ह्याकडे लक्ष वेधून आहे.



## टाकळीवाडी जागृत देवस्थान श्री म्हसोबा यात्रा २९ एप्रिल पासून



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाडी/प्रतिनिधी : टाकळीवाडी तालुका शिरोळ येथील जागृत देवस्थान श्री म्हसोबा यात्रा मोठ्या उत्साह संपन्न होणार आहे.

नवसाला पावणारा मसोबा देव अशी ख्याती आहे. हे देवस्थान गावच्या मध्यभागी असल्यामुळे याचे स्थान व प्रचिती फार मोठी आहे. या यात्रेचे नियोजन दि.२८ एप्रिल २०२६ रोजी भव्य धनगरी ढोल वादन स्पर्धा, दि. २९ एप्रिल २०२६ रोजी भव्य धनगरी ओवी चा कार्यक्रम रात्री ०९.०० वाजता, २९ एप्रिल संध्याकाळी चार वाजता भव्य पालखी मिरवणूक तसेच देवाचा मुख्य दिवस गुरुवार ३० एप्रिल २०२० रोजी सकाळी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

# सोलापूर ज्येष्ठ नागरिक संघाच्या अध्यक्षपदी विजय कुलकर्णी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : सोलापूर ज्येष्ठ नागरिक संघाच्या (फेस्कॉन) अध्यक्षपदी महापालिकेचे सेवानिवृत्त अभियंता व सामाजिक ज्येष्ठ कार्यकर्ते श्री.व्ही.एन तथा विजय कुलकर्णी यांची निवड करण्यात आली.या संघाची वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक पंचवीस एप्रिल रोजी पार पडली.त्या सभेत आगामी तीन वर्षासाठी नूतन कार्यकारिणी निवडण्यात आली. संघाच्या उपाध्यक्षपदी श्रीनिवास करकमकर, कार्याध्यक्षपदी रमेश सोनी, सचिवपदी नागनाथ पाटील, सहसचिवपदी सतीश पाटील, कोषाध्यक्षपदी अशोक गरड तर संघटकपदी श्रीमती निशा गोडबोले यांची निवड करण्यात आली.



तसेच संघाच्या कार्यकारिणीमध्ये सर्वश्री विजयकुमार अथतीकर, पन्नालाल चंडक, अरविंद जगताप, डॉ. राजीव मोहोळकर, विश्वास मोहिते, पांडुरंग अदोने, घनशाम दायमा, ॲड. राजेंद्र दीक्षित व गुरुलिंग कन्नुरकर यांचा समावेश करण्यात आला आहे. याशिवाय सल्लागार मंडळात सर्वश्री महादेव माने, श्रीमती कमलाताई शर्मा, विजयकुमार खंडेलवाल, बळवंत अहंकारी, पत्रकार दशरथ वडतिले व सुनील तथा दत्ता आराध्ये यांना संधी देण्यात आली आहे. या निवडीनंतर सर्व पदाधिकाऱ्यांचे हार्दिक अभिनंदन करण्यात आले.

## राज्य उत्पादन शुल्क विभागातील धाबा मालक आणि त्यांच्या साथीदारांनी केला जीवघेणा हल्ला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : सोलापूर जिल्ह्यातील माढा तालुक्यात अवैद्य मध्य विक्रीवर कारवाई करण्यासाठी गेलेल्या राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या (एुलळीश ऊशिरीशपीं) पथकावर धाबामालक आणि त्यांच्या साथीदारांनी जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे.

माढा कुडवाडी रस्त्यावरील उपळाई हद्दीत असलेल्या 'हॉटेल येडेश्वरी'येथेही घटना घडली, सगळीकडे दारू मिळते मग तुम्हाला आम्हीच दिसतो का? असा जाब विचारत हॉटेल मालक प्रमोद गोरे पाटील उर्फ ग*** यांनी आपल्या साथीदाराचं अधिकाऱ्यांवर प्लॅस्टिक पाईपने हल्ला केला व या हल्ल्यात उत्पादन शुल्क विभागाचे दुय्यम निरीक्षक अमित नागरे आणि जवान युवराज तळे हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर स्थानिक रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार या जागेवर विनापरवाना मध्यविक्री होत असल्याची खात्रीला एक माहिती मिळाल्यानंतर पथकाने छापा टाकला होता. कारवाईची प्रक्रिया सुरू असताना आणि त्यांचे चित्रीकरण करत असताना आरोपीने आक्रमक पवित्र घेतला व आरोपीने केवळ मारहाणच केली नाही तर शासकीय कामात अडथळा आणून चित्रीकरण असलेला मोबाईल ही हिसकावून घेतला. या प्रकरणी माढा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून मुख्य आरोपीवर यापूर्वी अवैध दारू विक्रीचे गुन्हे दाखल आहेत. अशी माहिती समोर आली आहे. त्याचा शोध घेण्यासाठी पदके रवाना केली आहेत.

# संस्थांनी एकत्र काम केल्यास आपत्तीवर नियंत्रण मिळवता येते : डॉ. अविनाश खांडेकर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : आपत्ती व्यवस्थापनात शासनाच्या कार्यक्रमाला सामाजिक संस्थांचे सहकार्य लाभल्यास आपत्तीत होणारे गंभीर धोके कमी होतात. आपत्ती नियंत्रण जरी शासनाचे काम असले तरी आपत्ती ओसरल्यानंतर खरी कसोटी सुरू होते आणि त्यावेळी सामाजिक संस्थांची भूमिका महत्त्वाची ठरते. वंचित, उपेक्षित व दुर्बल घटक आपत्तीत उपेक्षित राहतो त्यांना योग्य मदत वेळीस मिळाल्यास होणाऱ्या अन्याय अत्याचारावर नियंत्रण मिळवता येते. यावेळी संस्थांनी समन्वयाने काम केल्यास आपत्तीच्या वेळी होणारे नुकसान कमी करता येते. यासाठी सामाजिक संस्थांनी एकत्र येऊन काम केल्यास आपत्तीवर नियंत्रण मिळवता येते असे प्रतिपादन मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय मदत कक्ष जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूरचे अध्यक्ष डॉ. अविनाश खांडेकर यांनी केले.

ते फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखा व इंडियन रेड क्रॉस सोसायटी शाखा सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने श्रीमती गोपाबाई दमाणी रक्त संकलन केंद्राच्या सेमिनार हॉलमध्ये आयोजित नेटवर्किंग ऑर्गनायझेशनच्या मीटिंगमध्ये प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सोलापूर शाखेचे मार्गदर्शक प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर हे होते. यावेळी व्यासपीठावर सोलापूर ऑबस्ट्रिक्ट अँड गायनॅकॉलॉजिकल सोसायटीचे अध्यक्ष डॉ. विजय पवार, इंडियन रेड क्रॉस सोसायटी शाखा सोलापूरचे चेअरमन डॉ. राजीव प्रधान, फॅमिली प्लॅनिंग सोलापूर शाखेचे चेअरपर्सन प्रा. डॉ. एन.बी.तेली, माजी अध्यक्षा डॉ. नभा काकडे, शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड आदी उपस्थित होते.

प्रिसिजन फाउंडेशन सोलापूर, व्ही–एक्सेल एज्युकेशनल ट्रस्ट, हॅलो मेडिकल फाउंडेशन, युगंधर हॉस्पिटल, सोलापूर ऑबस्ट्रिक्ट अँड गायनॅकॉलॉजिकल सोसायटी, नेटवर्क ऑफ सोलापूर बाय पीपल लिविंग विथ एच. आय. व्ही./ एड्स, सोलापूर कॅन्सर सोसायटी, शासकीय रेणुका माता महिला वसतिगृह, सोलापूर जिल्हा सामाजिक कार्य समिती, गीतगंगा सोशल फाउंडेशन सोलापूर, सारथी युथ फाऊंडेशन सोलापूर, आधार मागासवर्गीय महिला संस्था सोलापूर, श्री सिद्धेश्वर कॅन्सर हॉस्पिटल सोलापूर, मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय मदत कक्ष, इंडियन रेड क्रॉस सोसायटी शाखा सोलापूर, प्रहार अपंग संघटना, सोलापूर या सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते.

यावेळी शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड व कार्यक्रम अधिकारी वीरेंद्र परदेशी यांनी मिस्प ऑब्जेक्टिव्ह, सामंजस्य करार व आपत्तीमध्ये नेटवर्किंग ऑर्गनायझेशनची भूमिका या विषयावर मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय समारोप करताना प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर म्हणाले की, सोलापूरमध्ये बालविवाह व बालमातांचे प्रमाण चिंताजनकरीत्या वाढत आहे. यामुळे महिलांवर शारीरिक, मानसिक व भावनिक परिणाम होतात. बालविवाह रोखण्यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक आहे.




कार्यक्रमाचे स्वागत प्रा. डॉ. एन. बी. तेली यांनी केले. प्रास्ताविक प्रा. डॉ. नभा काकडे यांनी मानले. सूत्रसंचालन सुगतरत्न गायकवाड यांनी केले तर आभार वीरेंद्र परदेशीं यांनी मानले.

**कल्याणशेट्टी महाविद्यालयात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणावर व्याख्यान कार्यक्रम**

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे विद्यार्थी लवकरच रोजगाराभिमुख होतील : प्राचार्य डॉ शिवाजीराव शिंदे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : राष्ट्रीय शिक्षण धोरणामुळे विद्यार्थ्यांना कौशल्याभिमुख शिक्षणाची द्वारे खुली झाल्यामुळे विद्यार्थ्यांच्या व्यापक संशोधन कार्यास प्रोत्साहन मिळाले आहे, त्यामुळे विद्यार्थी लवकरच रोजगाराभिमुख झालेला दिसेल असा विश्वास वाणिज्य व व्यवस्थापन विद्या शाखेचे प्रभारी अधिष्ठाता प्राचार्य डॉ शिवाजीराव शिंदे यांनी व्यक्त केले.

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणावर व्याख्यान देताना ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे जेष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी होते. यावेळी डॉ एस वाय जाधव, डॉ सुनील पाटील,डॉ ए जी माळगे, प्रा ए ए वरडोळे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी उपस्थित होते.




पुढे बोलताना ते म्हणाले की, नव्या शैक्षणिक धोरणामुळे शिक्षकांना सखोल प्रशिक्षण मिळाले आहे, नवीन अभ्यासक्रम आणि कौशल्यधारित शिक्षण समजावून घेण्यासाठी कार्यशाळा व प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आले असून आधुनिक प्रयोगशाळा, डिजिटल क्लासरूम, ई लर्निंग साधने, संगणक दालन आणि ग्रंथालय आदींची उपलब्धता वाढविण्यावर भर देण्यात आला आहे, त्यामुळे शिक्षण अधिक गुणवत्तापूर्ण व रोजगाराभिमुख झाले आहे.

**विद्यापीठाची कौतुकास्पद कामगिरी**

**कुलगुरू डॉ प्रकाश महानवर यांच्या मार्गदर्शनानुसार विद्यापीठाने नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी अत्यंत काटेकोरपणे केली आहे, ही कौतुकास्पद कामगिरी असून लवकरच या धोरणाचे परिणाम दिसून लागतील असे अधिष्ठाता डॉ शिवाजीराव शिंदे यांनी सांगितले.**

मल्लिनाथ कल्याणशेट्टी म्हणाले की, नवीन शैक्षणिक धोरण अधिक गतिशील बनवण्यासाठी विद्यार्थी व पालकांची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. कौशल्याभिमुख शिक्षण घेऊन रोजगाराची संधी मिळणार असेल तर नक्कीच धोरण उपयुक्त आहे असे म्हणावे लागेल त्यासाठी सर्व स्तरातून प्रयत्न होणे आवश्यक आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ एस आर लोखंडे यांनी केले, सूत्रसंचलन डॉ शितल झिंगाडे–भस्मे यांनी केले, आभार प्रा मधुबाला लोणारी यांनी मानले.

# जळगाव ग्रामपंचायत सरपंचपदी इंदुबाई कराड यांची बिनविरोध निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : तालुक्यातील जळगाव ग्राम पंचायत सरपंचपदी इंदुबाई केशव कराड यांची बिनविरोध निवड करण्यातआली.

विद्यमान सरपंच कांताबाई वडघुले यांनी सरपंचपदाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या जागेवर ही निवड करण्यात आली. सरपंच पदाच्या निवडीसाठी बोलावलेल्या बैठकीला इंदुबाई कराड, अजिंक्य कराड, कांताबाई वडघुले, सिंधुबाई वडघुले ,दिपाली कुंदे , दयानंद निरभवणे ,कैलास गभाले आदी ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते.

सरपंचपदासाठी इंदुबाई कराड यांच्या नामनिर्देशन पत्रावर सूचक म्हणून कैलास गभाले यांचे नाव होते इंदुबाई कराड यांचे एकमेव नामनिर्देशन पत्र दाखल झाल्याने त्यांची बिनविरोध निवड झाल्याची घोषणा निवडणूक अधिकारी म्हणून भोसले मॅडम यांनी केली

निवडणूक अधिकारी म्हणून अश्विनी भोसले यांनी काम पाहिले त्यांना तलाठी तन्वी कणसे, ग्राम सेवक अधिकारी सविता सानप यांनी सहकार्य केले.

निवडीनंतर नवनिर्वाचित सरपंच इंदुबाई कराड यांचा सत्कार करण्यात आला याप्रसंगी निफाड पंचायत समितीचे माजी सभापती सुभाष कराड, अशोक वडघुले, विश्वास कराड माजी सरपंच सुधीर कराड, संपतराव कराड, केशव कराड, सुधाकर वडघुले, अशोक कराड, अनिल कराड, भरत वडघुले, रमेश वडघुले, सखाराम कराड, माधव वडघुले, अमोल वडघुले, संदीप वडघुले, विजय वडघुले, युवराज वडघुले, सुरेश कराड, विजय नागरे, शांताराम कराड, बाळू नागरे, संजय कराड, भूषण पंडित, राहुल नागरे, वैभव निरभवणे आदी उपस्थित होते.



# राजेंद्र राऊतांना विधान परिषदेची लॉटरी लागणार?

## राजेंद्र राऊत यांच्या राजकीय भविष्याबद्दल मुख्यमंत्र्यांचे सूचक विधान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : विधान परिषद निवडणुकीचे पडघम वाजत असताना राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी २८ एप्रिल रोजी बार्शीचा दौरा केला. भगवंत महोत्सवाच्या निमित्ताने तब्बल चार वर्षानंतर बार्शीत आलेल्या मुख्यमंत्र्यांनी माजी आमदार राजेंद्र राऊत यांच्या कार्याची भरभरून कौतुक केले.

राऊत यांच्या राजकीय भविष्याबद्दल मुख्यमंत्र्यांनी केलेली सूचक विधान सध्या सोलापूर जिल्ह्याच्या राजकारणात चर्चेचा विषय ठरला आहे. विधानसभा



निवडणुकीतील पराभवानंतर राजेंद्र राऊत यांनी बार्शी जोरदार पुनर आगमन केले आहे. बार्शी बाजार समिती नगरपालिके नंतर त्यांनी पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेचे सर्व जागांवर विजय मिळवून आपली ताकद सिद्ध केली आहे.

ह्या पार्श्वभूमीवर विधान परिषदेसाठी सोलापूर जिल्ह्यातून पसंतराव परिचारक, राम सातपुते आणि शहाजी पवार यांच्यासोबत राजेंद्र राऊत यांचे नाव आघाडीवर आहे.

**मुख्यमंत्री काय म्हणाली?**

वार्षिक माध्यमांशी बोलताना देवेंद्र फडणवीस यांनी या निवडणुकीचा निकाल म्हणजे पाठीमागून केलेली चूक याची जाणीव होऊन राजाभाऊंना मोठा आशीर्वाद जनतेने दिलेला आहे.

अजून भरपूर राजकीय आयुष्य आहे. त्यांना अनेक पदे मिळतील. यांच्यासारख्या नेत्याची भाजपमध्ये निश्चितपणे त्यांचे स्वागतच केली जाईल.

# तळघर ग्रामस्थ मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने श्री लक्ष्मी नारायण मंदिर जीर्णोद्धार व प्राणप्रतिष्ठा तसेच पालखी सोहळ्याचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/केतन भोज : रायगड जिल्ह्यातील तळा तालुक्यातील तळघर,पोस्ट तळेगाव येथे तळघर ग्रामस्थ मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने २६ वे वर्ष-श्री लक्ष्मी नारायण मंदिराचा जीर्णोद्धार,प्राणप्रतिष्ठा सोहळा, श्री लक्ष्मी नारायण मंदिर पालखी सोहळ्याचे भव्य आयोजन तसेच श्री सत्यनारायण महापूजा आयोजित करण्यात आली आहे.हा सोहळा गुरुवार दि.१४ मे २०२६ आणि शुक्रवार दि.१५ मे २०२६ रोजी संपन्न होणार असून,यानिमित्त विविध धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे भव्य आयोजन करण्यात आले आहे.

दिनांक १४ मे रोजी सकाळी कलशपूजन आणि प्राणप्रतिष्ठा सोहळ्याने कार्यक्रमाची सुरुवात होईल. दुपारी मान्यवरांचा सत्कार समारंभ आणि महिलांसाठी हळदीकुंकू कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. रात्री ९ ते ११ वाजेपर्यंत ह.भ.प.सोनालीताई सूरज अडखळे यांचे कीर्तन आयोजित करण्यात आले आहे. दुसऱ्या दिवशी १५ मे शुक्रवार रोजी पहाटे काकड आरती(श्री.सुभाष मुंडे व ग्रामस्थ मंडळ मुंड्याची वाडी,तळा)होणार आहे.त्या नंतर अभिषेक आणि सत्यनारायण महापूजा आयोजित करण्यात आली आहे.दुपारी १ ते सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत भव्य पालखी मिरवणूक निघेल.त्या नंतर सर्व उपस्थित भाविक भक्तांसाठी महाप्रसाद ठेवण्यात आला आहे.रात्री तळघर महिला/पुरूष सामूहिक भजन होणार आहे. आणि तद्नंतर रात्री उशिरापर्यंत स्थानिक कलाकारांचे सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले जाणार आहेत. कार्यक्रमाला राजकीय व सामाजिक मान्यवरांची उपस्थिती लाभणार असून सोहळ्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून रायगड लोकसभेचे खासदार सुनील तटकरे, महाराष्ट्र राज्याच्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे आणि मा.विधान परिषद सदस्य अनिकेत तटकरे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. तसेच स्थानिक जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, नगराध्यक्ष, सभापती, शासकीय सेवेतील अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध क्षेत्रातील मान्यवर यांची प्रमुख उपस्थिती या कार्यक्रमाला लाभणार आहे.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी तळघर ग्रामस्थ मंडळ तसेच महिला मंडळ व युवक मंडळ यांनी विशेष परिश्रम घेतले आहेत. सर्व ग्रामस्थांनी मोठ्या उत्साहाने व श्रद्धेने या सोहळ्यात सहभाग नोंदवावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. या धार्मिक सोहळ्यामुळे परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले असून,गावात उत्साहाचे व आनंदाचे वातावरण पसरले आहे.

# निफाडमध्ये कृषी निविष्ठा दुकाने बेमुदत बंद; प्रशासनाला निवेदन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड तालुका ॲग्रो डिलर्स असोसिएशन यांच्या वतीने दि. २७ एप्रिल २०२६ पासून राज्यभर कृषी निविष्ठा विक्री केंद्रे बेमुदत बंद ठेवण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला आहे.

या पार्श्वभूमीवर पंचायत समिती कृषि अधिकारी . मोगल, तालुका कृषि अधिकारी सुधाकर पवार तसेच निफाड तहसीलदार विशाल नाईकवाडे यांना निवेदन देण्यात आले.हा बंद महाराष्ट्र फर्टिलायझर्स पेस्टिसाइड्स सीड्स डिलर्स असोसिएशन यांच्या आवाहनानुसार पुकारण्यात आला असून, निफाड तालुक्यातील सर्व कृषी निविष्ठा विक्रेते या आंदोलनात सहभागी झाले आहेत. सदरच्या निवेदनामध्ये प्रमुख मागण्या-

कंपन्यांकडून होणाऱ्या लिंकिंग पद्धतीला विरोध

अनधिकृत एजंटमार्फत विक्री थांबवावी

खत व कीटकनाशक विक्रीवरील कडक नियम शिथिल करावेत, नवीन नियमांमुळे वाढलेला प्रशासकीय ताण कमी करावा, शेतकऱ्यांच्या नुकसानीसाठी दुकानदारांना जबाबदार धरणे थांबवावे, अनधिकृत बीटी बियाणे विक्रीवर नियंत्रण आणावे या मागण्या करण्यात आल्या असून यावेळी अध्यक्ष बाळासाहेब जाधव उपाध्यक्ष रामभाऊ माळोदे सरचिटणीस जयंत कापसे सहसरचिटणीस प्रल्हाद खडांगळे खजिनदार ईश्वर जाधव व संस्थेचे संचालक मंडळ श्रीराम ढोमसे रामदास टर्ले, विनायक कुशारे, प्रमोद गांधी, मनोज कापडी, ज्ञानेश्वर कार्लेकर, रावसाहेब माळोदे, अशोक पाल्हाळ, हरीश मोरे, देविदास शिंदे, अनिरुद्ध जाधव, संदीप भोसले, व तालुक्यातील विक्रेते सतीश खांडे पिंपळगाव बसवंत सतीश बोंबले चितेगाव फाटा विक्रम तासकर, उमेश पाटील, अनिल पाटील ,शरद वाघ, वासुदेव काठे, प्रमोद मोरे, योगेश सूर्यवंशी, रमेश दराडे, रवींद्र आव्हाड, मनोहर डेरले, घुमरे साहेब, शेतकरी संघ दीपक कापडी, अजित मोगल, बापूसाहेब गायकवाड, अजब सिंग, संदीप राजवळ ,श्याम वाघ, अश्विन डोंगरे, कर्मचारी नितीन दुसाने, आदी उपस्थित होते यावेळी शासनाने तात्काळ निर्णय न घेतल्यास हा बंद बेमुदत सुरूच राहील, असा इशारा संघटनेच्या वतीने देण्यत आला आहे.

# जबलपूर येथे कुर्मी राष्ट्रीय अधिवेशनात महाराष्ट्राचा तलवार देऊन गौरव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

जबलपूर (मध्यप्रदेश)/ केतन भोज : अखिल भारतीय कुर्मी क्षत्रिय महासभेचे ४६ वे राष्ट्रीय अधिवेशन मध्यप्रदेशातील जबलपूर येथे प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडले. देशभरातील विविध राज्यांमधून प्रदेश व जिल्हास्तरीय पदाधिकारी मोठ्या संख्येने या अधिवेशनात सहभागी झाले होते.

या अधिवेशनात पटेल, पाटीदार, मराठा, कुणबी, कुर्मी, कुडुंबर, कुडमी, कापू, कम्मा, कलबी, कुलमी, ओक्का लिंगा, देवेंद्र कुल वेल्लालार, महतो, खंडायत, गुर्जर, नायक, नायडू आदी विविध समाजघटक कुर्मी या प्रातिनिधिक या नावात येत असून त्या सर्व प्रतिनिधींनी हजेरी लावली होती. तसेच या समाजाच्या सर्व राज्यांच्या समित्यांचा सक्रिय सहभाग या कार्यक्रमात दिसून आला.महाराष्ट्रात कुर्मी( कुणबी.मराठा) महासभेचे संघटन मजबूत करण्यासाठी राबविण्यात आलेल्या उपक्रमांमुळे राज्याने देशात अव्वल स्थान मिळवले. प्रदेश अध्यक्ष संजय पाटील, यांच्या नेतृत्वाखाली युवा महासभा, महिला महासभा, विद्यार्थी महासभा, उद्योग महासभा, पुरोहित महासभा आणि कृषी महासभा या विविध शाखांद्वारे प्रभावीपणे कामगिरी करण्यात आली.या उल्लेखनीय कार्याची दखल घेत मान्यवरांच्या उपस्थितीत राष्ट्रीय अध्यक्ष आणि महासचिव यांच्या हस्ते प्रदेश अध्यक्ष संजय पाटील व युवा प्रदेश अध्यक्ष प्रमोद ठोंबे पाटील यांचा तलवार व पगडी देऊन विशेष गौरव करण्यात आला.



१८९४ मध्ये नोंदणीकृत असलेली ही महासभा विविध समाजघटकांच्या न्याय व हक्कांसाठी कार्यरत आहे. याच संस्थेने १९१९ साली लखनौ येथे छत्रपती शाहू महाराजांना राजश्री ही उपाधी देऊन सन्मानित केले होते. आत्तापर्यंत महाराष्ट्रातील आठ मान्यवरांनी या राष्ट्रीय अधिवेशनाचे अध्यक्षपद भूषविले आहे. त्यामध्ये छत्रपती शाहू महाराज, स्व. मुख्यमंत्री वसंतदादा पाटील आणि देशाचे पहिले कृषिमंत्री पंजाबराव देशमुख यांचा विशेष उल्लेख केला जातो.

# कळंब येथे वंचित बहुजन आघाडीच्या वतीने 'शिवाजी कोण होता?' पुस्तकाचे सामूहिक वाचन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : वंचित बहुजन आघाडी, कळंब तालुका यांच्या वतीने आज छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे कॉ. गोविंद पानसरे लिखित 'शिवाजी कोण होता?' या पुस्तकाचे सामूहिक वाचन करण्यात आले. श्रद्धेय नेते अड. प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांच्या आदेशानुसार हा उपक्रम राबवण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून झाली. यावेळी उपस्थित कार्यकर्त्यांनी शिवाजी महाराजांच्या जयघोषाने संपूर्ण परिसर दणाणून सोडला. पुस्तक वाचनातून शिवरायांच्या खऱ्या इतिहासाची व समतेच्या विचारांची जाणीव कार्यकर्त्यांना करून देण्यात आली.

या प्रसंगी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब कांबळे, रिपब्लिकन सेनेचे जिल्हाध्यक्ष अनिल हजारे, भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हाध्यक्ष एल.आर. धावारे, तालुका महासचिव बी.एम. आव्हाड, मेजर विठ्ठल हजारे यांच्यासह रतन सावंत, लहू हिंगे, दत्ता पाचपिंडे, बाबासाहेब टोपे, गौतम वाघमारे आदी पदाधिकारी व ग्राम शाखांचे अनेक सक्रिय कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वंचित बहुजन आघाडीच्या माध्यमातून वैचारिक प्रबोधनाचा हा उपक्रम तालुक्यात चर्चेचा विषय ठरला.

मानवी आरोग्यरक्षक म्हणून पशुवैद्यकांनी कार्य करावे

प्रशासन जागा हो... नागरीकांचा सवाल..!

# खांबीची सौरऊर्जा जल सुविधा सुरू करा; नागरिकांची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बाराभाटी : पूर्व विदर्भात प्रामुख्याने मार्च महिन्याच्या सुरुवातीपासून उन्हाळ्याची जाणीव होऊ लागते आणि उष्णता वाढण्यास सुरुवात होते. आताच्या घडीला गोंदिया जिल्ह्याचा तापमान ४४ अंश डिग्री सेल्सिअस एवढ्या प्रमाणावर आहे. उन्हाळ्यातील एप्रिल, मे आणि जून हे तीन महिने मानवी जीवाला उष्माघातापासून धोकादायक ठरत, अनेक गावाच्या किंवा इतर ठिकाणी पाण्याविषयी विविध समस्या निर्माण होत असतात.

त्यातच अर्जुनी मोरगाव तालुक्यातील खांबी येथील वार्ड क्रमांक ३ मधील सौरऊर्जेच्या मीटर मध्ये बिघाड आल्याने सौरऊर्जेवर आधारित लघु पाणी पुरवठा बंद झाला आहे.

पावसाळा व हिवाळ्यामध्ये पाणी पातळीत वाढ असते यावेळी पाण्यासंबंधित कोणत्याही समस्या निर्माण होत नसतात त्याकाळात पाण्याचा उपयोग हा सुद्धा पाहिजे त्या प्रमाणात होत नसतो. या ऋतूमध्ये उन्हाची चाहूल सुद्धा अगदी नाहीच्या बरोबर लागत असल्यामुळे पावसाळा व हिवाळ्यात कोणत्याही पाण्यासंबंधित






समस्या उद्भवत नसतात.

प्रामुख्याने एप्रिल, मे महिन्यांना सुरुवात झाली कि कडक उन्हाळ्याला सुरुवात होत. लाय, लाय उन्हाची चाहूल लागत असते. आणि उष्णतेचा पारा सुद्धा ४२ओ, ४४ओउ वरती जाते. उन्हाळा ऋतू लागला कि अनेक ठिकाणी पाण्याची समस्या निर्माण होत असते.

अर्जुनी मोरगाव तालुक्यातील खांबी येथील वार्ड क्रमांक ३ मधील बौद्ध विहाराच्या परिसरात शासकीय विहीर आहे. त्या विहिरीवर वार्ड व इतर वार्ड येथील अनेक नागरीक पाणी भरायला येत असतात. या शासकीय विहिरीवर सौर ऊर्जेच्या लघु पाणी पुरवठ्याच्या माध्यमातून नळ लावण्यात आले असून वर्ष लोटून काही महिने सौरऊर्जेवरील पाणी पुरवठा चालू होता मात्र त्या ठिकाणी सौरऊर्जेवरील पाणी पुरवठा चालू, बंद करणारा विद्युत मीटर बिघाड झाल्यानंतर एक महिना लोटून हि बाब प्रशासनाने लक्षात घेता एक दुरुस्तीला घेऊन गेले असल्याने मागील दिड ते दोन महिन्यापासून बिघाड झालेला सौरऊर्जेवरील पाणी पुरवठा करणारा विद्युत मीटर अजून पर्यंत लागण्यास आहे.

त्यामुळे सदर विहिरीवरती सौरऊर्जेवरील लघु पाणी पुरवठ्याच्या माध्यमातून नळ लावले गेले आहेत. पण ते सौरऊर्जा पाणी पुरवठा विद्युत मीटर बंद झाला असल्याने या नळावर पाणी भरायला येणारे नागरीक यांना भर उन्हात गावातील अन्य ठिकाणच्या बोरवेल किंवा विहिरीचा आधार घेत पाण्यासाठी संघर्ष करून या सूर्याच्या तापत्या कडक उन्हात घाम गाळून त्रास सहन करत पाणी भरावा लागते आहे. या विशेष गंभीर आणि भीषण पाणी टंचाईच्या समस्येकडे दुर्लक्ष होत असल्याचे स्थानिक नागरीक म्हणतं आहेत.

काही वर्ष व महिने होत आहेत. त्या शासकीय विहिरीवरती काही गावातील नागरीकांनी घरगुती मोटार पंप लावून आपल्या घरी पाईप लांबवून पाईपद्वारे पाणी घरी नेण्यात येत आहे. मोटार पंप लावून पाईपद्वारे पाणी लावताना अनावश्यक पाणी वाया जात असते आणि पाण्याची

> **वार्ड क्रमांक ३ मधील सौरऊर्जा पाणी पुरवठा विद्युत मीटर हा बिघाड झाल्याने त्याला संबंधित कंपनीमध्ये दुरुस्ती करीता पाठविले असता त्या कंपनीची प्रक्रिया लांब आहे. त्यामुळे सौरऊर्जा विद्युत मीटर दुरुस्ती होवून केव्हा लागणार काही सांगताच येणार नाही.**
>
> **त्या सदर शासकीय विहिरीवरती गावातील काही नागरीकांनी घरगुती मोटार पंप लावलेले आहेत. मात्र ते मोटार पंप बौद्ध विहार समाजाच्या वतीने लावले असल्याचे वाटले नंतर काही नागरीकांनी सांगितल्याने माहिती झाली नाहीतर माहितीच नाही.**
>
> **– रोहित मेश्राम, ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत, खांबी**

पातळी हि उन्हाळ्यामध्येच खाली जात असते. त्यामुळेच पाण्याची समस्या हि अधिकच उन्हाळ्यामध्ये उद्भवत असते. तरी सुद्धा या शासकीय विहिरीवरील लावलेल्या घरगुती मोटार पंप हटवण्यात याव्यात या समस्यांच्या सर्व बाबी ग्रामपंचायत प्रशासनाला मागील काळात एका अर्जाच्या माध्यमातून लक्षात आणून दिल्या गेल्या असून मात्र या विशेष गंभीर आणि भीषण समस्याकडे दुर्लक्ष केला जात आहे. या गंभीर, तीव्र समस्येला प्रशासन का? बरं, दुर्लक्ष करतो. हाच एक मोठा प्रश्न नागरीकांना पडतो आहे.

ऐन आता कडक उन्हाळ्यात पाण्याची तीव्र समस्या निर्माण होणे म्हणजे त्या संबंधित नागरीकांना पाण्यासाठी वन,वन भटकंती करून शारीरिक आणि मानसिक त्रास सहन करणे होय. मात्र प्रशासनाचे याकडे कोणत्याही प्रकारचे गांभीर्यपूर्वक लक्ष दिले जात नसल्याचे चित्र दिसत आहे.

परिणामी सौरऊर्जेवर आधारित पाणी पुरवठा विद्युत मीटर दिड ते दोन महिन्यापासून बंद पडलेला असून दुरुस्ती होवून लागणार कधी, हाच अत्यावश्यक प्रश्न वार्ड क्रमांक ३ मधील नागरीकांना पडलेला आहे. सौरऊर्जा पाणी पुरवठा विद्युत मीटर तात्काळ लावण्यात यावे आणि शासकीय विहिरीवर लावलेल्या घरगुती मोटार पंप हटवण्यात याव्यात अशी मागणी खांबी वार्ड क्रमांक ३ मधील नागरीकांनी केली आहे.